दै. सकाळ दि. 15/12/2019

सकाळ दि. 15/12/19

# फरार आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**नांदेड, ता.१४ (बातमीदार) :** गंभीर गुन्ह्यात मागील काही दिवसांपासून फरार असलेल्या गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. भाग्यनगर पोलिसांनी त्याला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गंभीर गुन्हा करून तेजपाल उर्फ तेज्या वांगा कुलवतसिंग चहेल हा फरार होता. त्याच्याविरुध्द वजिराबाद, नांदेड ग्रामीण आणि भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. भाग्यनगर ठाण्याच्या हद्दीत दरोड्याच्या तयारीत असतांना पोलिसांना पाहून तो पसार झाला होता. त्याला शुक्रवारी (ता.१३) रात्री स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानी अटक केली. पोलिस निरीक्षक अनिरूध्द काकडे यांनी त्याला न्यायालयासमोर हजर केले.